पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०९**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०४/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **०८/०४/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.कदम निकीता अर्जुन
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.चारठाणकर- उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, मा.पाटील- प्राचार्य, आयटीआय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) ठराव रदद करणेबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण मनपा कार्यालये व दवाखाने येथे सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणेबाबत.- मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेमध्ये स्वच्छता किट पुरविणेबाबत. - मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व बालवाडया, सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर बसविणे कामी मे.समृध्दी एंटरप्रायजेस या अनुभवी संस्थेस थेट पध्दतीने काम देणेबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

दिनांक **२५/०३/२०२१** रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३०                                                    विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०८/०४/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे                                    अनुमोदक : मा.माधवी राजापुरे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.२७ दिनांक-२५/०३/२०२१ रद्द करणेस मान्यता देण्यात येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१                                                    विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०८/०४/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे                                          अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळी दरम्यान वापरल्या जाणा-या सॅनिटरी पॅड वापराचे प्रमाण अत्यल्प आहे, त्यामुळे हे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच वापरल्या जाणा-या सॅनिटरी पॅडचे विघटन होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण म.न.पा. कार्यालये व दवाखाने येथे सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व डिस्पोजेबल मशीन बसविणे करिता सर्व म.न.पा. कार्यालये व दवाखान्यांची अद्ययावत आकेडीवारीनुसार सदरचे प्रक्रियेमध्ये संपूर्ण प्रशासकिय कार्यवाही नागरवस्ती विभागामार्फत करणेत येऊन त्यानुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०२१-२०२२ या अंदाजपत्रामध्ये नागरवस्ती विभागाकडील उपलब्ध तरतूदीमधून  करणेस मान्यता देण्यात येत आहे. सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंगच्या वापरातून अल्प दरात उत्तम दर्जाचे नॅपकिन उपलब्ध करून देता येईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणा-या सार्वजनिक शौचालये, संपुर्ण म.न.पा. कार्यालये व दवाखाने या भागात सॅनिटरी पॅड वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होईल व नॅपकिन विघटनाचे नियोजन सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशीन मार्फत केले जाईल. या उपक्रमाचा सकारात्मक विचार करून हा उपक्रम राबविणे बाबत मान्यता देण्यास व सदरच्या खर्चास मान्यता देणेकामी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०८/०४/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बालवाडी वर्गांमधील बालकांना स्वच्छता किट पुरविले जाते. सदरचे प्रक्रियेमध्ये संपुर्ण प्रशासकिय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेत आली असून याबाबत वैद्यकिय विभागाकडून या स्वच्छता किट मधील साहित्य ठरविण्यात आले होते व सदर किटची खरेदी भांडार विभागाकडून करुन या कामी येणा-या खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील तरतूदीमधून करणेत आलेली आहे. तरी सदरची योजना सन २०२१-२२ या वर्षाकरिता महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाड्यांमधील शिशु व बालकांना स्वच्छता किट साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेस तसेच याबाबत वैद्यकिय विभागाकडून या स्वच्छता किटमधील १.मास्क, २.साबण, ३.टुथ ब्रश, ४.कंगवा, ५.सॅनिटायझर, ६.हॅन्ड वॉश, ७.टुथ पेस्ट, ८.नॅपकीन, ९.अँन्टीसेप्टीक लिक्विड, १०.नेल कटर, ११.मेडीकेअर शाम्पू. इ.साहित्य ठरवून सदरची खरेदी सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता भांडार विभागाकडून मान्य केलेल्या दरानुसार मे.साई समर्थ एंटरप्रायजेस या अनुभवी संस्थेमार्फत माहे जुन २०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधी मध्ये दर तीन महिन्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांना स्वच्छता कीट पुरविणेस मान्यता देणेकामी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०८/०४/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सविता खुळे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व बालवाड्या, सर्व प्राथमिक शाळा व सर्व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर (एकत्रित युनिट) बसविणेबाबत योजना राबविणेकरिता सर्व शाळांची अद्ययावत आकेडीवारीनुसार सदरचे प्रक्रियेमध्ये संपूर्ण प्रशासकिय कार्यवाही नागरवस्ती विभागामार्फत करणेत येऊन त्यानुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यास याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०२१-२०२२ या अंदाजपत्रामध्ये महिला व बालकल्याण योजने अंतर्गत नागरवस्ती विभागाकडील उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता देण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व बालवाड्या, सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कूलर (एकत्रित युनिट) बसविणे कामी M/S SAMRUDDHI ENTERPRISES या अनुभवी संस्थेस थेट पद्धतीने काम देणेस मान्यता देण्यास व सदरच्या खर्चास मान्यता देणेकामी स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१९६/२०२१
दिनांक : ०८/०४/२०२१



( **उल्हास बबनराव जगताप** )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.